**विंधण विहिर कार्यक्रमासाठी खाजगी विंधणयंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे दर ठरवून खाजगी विंधणयंत्रे भाड्याने लावण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय ग्रापापु१००२/प्र.क्र.६३६/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २९ डिसेंबर, २००५**

**वाचा :- शासन ज्ञापन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१००४/प्र.क्र.६३६/पापु-०७, दि. ३०.१०.२००४ व दि. २३ मार्च, २००५**

**प्रस्तावना :-**

संदर्भीय शासन ज्ञापनान्वये विंधण विहिर कार्यक्रमासाठी खाजगी विंधणयंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे दर ठरवून देण्यात आले असून, या शासनमान्य दरांच्या अधीन राहून खाजगी विंधणयंत्र धारकांची विंधणयंत्रे दि. ३१.८.२००५ पर्यंत भाड्याने लावण्यास परवानगी देण्यात आली आहे.

२. विंधण विहिरी कार्यक्रम महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची खरेदी करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांना देण्यात आलेले आहेत. त्यामुळे खाजगी विंधण यंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे दर ठरविण्याचे व त्यानुसार विंधणयंत्रे भाड्याने लावण्याचे अधिकार जिल्हा परिषदांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून **खाजगी विंधण यंत्रांमार्फत करावयाच्या आवेधन कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे जिल्ह्याचे दर ठरविण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेस देण्यात येत आहेत.**

२. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांनी खाजगी विंधणयंत्रांमार्फत करावयाच्या विंधण कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे दर विश्लेषण करून जिल्हानिहाय **कमाल दर निश्चित** करावेत व ते संबंधित जिल्हा परिषदांना **दर वर्षी ३१ ऑगस्ट पूर्वी कळवावेत.** चालू वर्षासाठीचे दर विश्लेषण लवकरात लवकर करून ते जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे.

३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांनी निश्चित केलेल्या कमाल दरांच्या अधीन राहून, विंधण कामाचे व तद्अनुषंगीक बाबींचे दर संबंधित जिल्हा परिषदांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून निश्चित करावेत व त्या निश्चित केलेल्या दरांच्या अधीन राहून आवश्यकतेनुसार विंधणयंत्रे भाड्याने लावावीत.

४. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या मार्फत चालू वर्षाचे दर विश्लेषण निश्चित होईपर्यंत संदर्भीय शासन ज्ञापनाअन्वये शासनाने निश्चित केलेल्या कमाल दराच्या अधिन राहून जिल्हा परिषदांनी दर निश्चित करण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(संजीव कुमार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६) मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
८) विभागीय आयुक्त (सर्व)
९) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१०) संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे.
११) जिल्हाधिकारी (सर्व)
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४)जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५)कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१६) महालेखापाल, महाराष्ट्र - १ मुंबई (लेखा परिक्षा)
१७) महालेखापाल, महाराष्ट्र - १ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
१८) महालेखापाल, महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा)
१९) महालेखापाल, महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
२०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
२१) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२२) सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२३) सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२४) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२५) सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२६) सर्व तहसीलदार
२७) निवडनस्ती पापु-०७, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग